# महाराष्ट्र शासन
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.
# विधी सल्लागार कंत्राटी पदभरती जाहिरात

कोल्हापूर वनवृत्ताकरीता विधी सल्लागार यांचे पद कंत्राटी पध्दतीने भरण्याकरिता जाहिरात क्रमांक कक्ष-४-१/ आस्था/१८-१९/१/ दिनांक २१/६/२०१८

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक एस-३०/१२/२०१२/प्रक्र.२३३/फ-६, दिनांक १३/११/२०१३ अन्वये वनविभागातील जमिन विषयक तसेच इतर न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यास मदत व्हावी या दृष्टीकोनातून कोल्हापूर वनवृत्तासाठी (कोल्हापूर प्रादेशिक वनवृत्त व सर्व प्रादेशिक वनविभाग / मुख्य वनसंरक्षक,तथा क्षेत्र संचालक सहयाद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर) १ विधी सल्लागार यांची रु.५००००/-(पन्नास हजार रुपये फक्त) प्रति महिना इतक्या ठोक रक्कमेवर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करावयाच्या विधी सल्लागार यांची निवड प्रक्रिया, शैक्षणिक अर्हता, अनुभव, अटी / शर्ती, कर्तव्य व जबाबदा-य पुढील प्रमाणे आहेत.**

**<u>कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया</u>**

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

१. उमेदवार सेवा निवृत्त जिल्हा न्यायाधिश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश / प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
असावा.असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर कोणत्याही शासकीय संस्था किंवा सार्वजनिक उपक्रमासाठी विधी सल्लागार म्हणून किमान २० वर्षाचा अनुभव असलेला असावा. उपरोक्त दोन्ही श्रेणीचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आणि त्यापेक्षा वरिष्ठ न्यायालयात / कामगार न्यायालयात किंवा औद्योगीक न्यायालयात अभियोक्ता म्हणून फौजदारी,दिवाणी,आस्थापना विषयक किंवा यथास्थितीत कामगार विषयक प्रकरणे किमान १० वर्षे हाताळणाऱ्या उमेदवारांचा विचार करता येईल.

२. उमेदवार वन विषयक,फौजदारी व दिवाणी विषयक,सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबत ज्ञानसंपन्न असेल.

३. उमेदवारास मराठी,इंग्रजी व हिंदी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.

**नियुक्तीबाबतची प्रक्रिया :-**

विधी सल्लागार यांची नियुक्ती खालील समिती मार्फत, उमेदवारांकडून प्राप्त अर्जाची पडताळणी केल्यानंतर अर्हता पुर्ण करणा-या उमेदवारांच्या मुलाखतीव्दारे करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर | :- | अध्यक्ष |
| जिल्हाधिकारी, कोल्हापूर | :- | सदस्य |
| सह सचिव, विधी व न्याय विभाग (मुंबई ) | :- | सदस्य |
| उप वनसंरक्षक (प्रादेशिक), कोल्हापूर (मुख्यालय) | :- | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीमार्फत यशस्वी उमेदवारास नियुक्तीबाबत लेखी स्वरुपात मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर वनवृत्त, कोल्हापू यांचेमार्फत कळविण्यात येईल.

निवड झालेल्या उमेदवारास परिशिष्ट-अ (दि.१३ नोव्हेंबर २०१३ चे शासन निर्णयाप्रमाणे) मधिल विनीर्दिष्ट करारनामा करणे बंधनकारक राहील. शासनाच्या वतीने मुख्य वनसंरक्षक, कोल्हापूर वनवृत्त, कोल्हापूर हे करारनामा करतील.

**विधी सल्लागारांच्या जबाबदाऱ्या :-**

१. संबंधित वन अधिकाऱ्याकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखी स्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. कोल्हापूर प्रादेशिक वनवृत्त व त्या अंतर्गत सर्व प्रादेशिक वनविभाग तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) कोल्हापूर विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे,याबाबत संबंधित वन अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधिन वन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी/तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिकाऱ्यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे. मात्र या बाबतची माहिती अद्यावत ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी वन विभागाच्या संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

४. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास,अपील/पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी,याबाबत दक्षता घेणे.

५.विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

६. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वनविभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.

**अटी व शर्ती :-**

१ सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. हे विधी सल्लागार शासकीय सेवक म्हणून गणले जाणार नाहीत. त्यांची नियुक्त सोबत जोडलेले परिशिष्ट-अ मधील विनिर्दिष्ट करारनामाच्या अधिन राहिल.

२ परिशिष्ट-अ मधील उल्लेखित सक्षम प्राधिकारी(Competent Authority) याचा अर्थ संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक असा आहे.

३ विधी सल्लागारास मानधन संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचेमार्फत आदा करणेत येईल.

४ सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्याकरिता करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापी अशी मुदत वाढवितांना एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही याची काळजी सक्षम प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्त करता येईल. त्यानंतर अशा उमेदवारांची पुनश्च नियुक्त करणे आवश्यक आहे. असे सक्षम प्रधिकाऱ्यांचे मत झाल्यास,त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

५ सं बंधित सक्षम प्राधिकारी शासनाच्या वतीने नियुक्तीचे वेळी संबंधिताबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. कराराचे विहित प्रपत्र परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आले आहे. कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबंधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाची जबाबदारी राहील.

६ करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या विधी सल्लागांराना एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

**अर्ज स्विकारण्याचा शेवटचा दिनांक :- दिनांक ६/०७/२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.**

**अर्ज करण्याची पध्दत :-**

अर्जदाराने अर्जाच्या विहीत नमुन्यात त्यांने स्वत:चे संपुर्ण नाव, जन्म दिनांक, शैक्षणिक पात्रता, पत्रव्यवहाराचा पत्ता, दुरध्वनी / मोबाईल क्रमांक, इ. सुवाच्य अक्षरात अथवा संगणकीकृत करुन नमूद करावा, स्वाक्षरी करावी. तसेच स्वत:चे अलीकडील काढलेले पासपोर्ट साईज फोटो अर्जावर चिकटवावा. तसेच विधी सल्लागार करीता वर नमूद अटी व शर्तीनुसार आवश्यक सर्व शैक्षणिक अर्हतांचे, अनुभव इत्यादी प्रमाणपत्रांचे छायांकित व साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात तसेच अर्ज व सर्व कागदपत्रे लिफाफ्यात बंद करुन खालील नमूद कार्यालयात पोस्टाव्दारे दिनांक ६/०७/२०१८ पर्यंत पोहचेल अशा प्रकारे पाठवावे. विहीत तारखेनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र अर्जदारांना मुलाखतीकरिता वेगळयाने सुचित करण्यात येईल.

सदर पदाबाबत ज्यांना अर्ज करावयाचा आहे. त्यांनी खालील पत्यावर अर्ज करावेत. अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय, वनवर्धन बिल्डींग,**

**हेड पोस्ट ऑफिससमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६००३ दुरध्वनी क्रमांक - ०२३१-२६५३६३२**

**www.mahaforest.nic.in**

सही /-

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)

कोल्हापूर

(४)

# ११ महिन्यांचे कंत्राटी तत्वावर विधी सल्लागाराचे नियुक्ती बाबत अर्ज

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
कोल्हापूर

आपले कार्यालयाचे दिनांक २१/६/२०१८ चे जाहिरीतीस अनुसरुन कोल्हापूर वनावृत्ताकरिता ११ महिंन्यांचे कंत्राटी तत्वावर नियुक्ती करावयाच्या विधी सल्लागाराचे कंत्राटी पदाकरिता अर्ज सादर करीता आहे.या करिता आवश्यक असलेली माझी संपुर्ण माहिती खालील प्रमाणे देत आहे.

१. संपुर्ण नाव.(मराठी व इंग्रजीमध्ये) :- -------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता,दुरध्वनी,भ्रमणध्वनी क्रं व ईमेलसह:- -----------------------------------

३. जन्मतारीख:-------------------------------------------------------------------------------

४. कायदेविषयक शैक्षणिक अर्हतेचा तपशिल:--

| अ.क्र. | अर्हतेचा तपशिल | विद्यापीठाचे नांव | पदवीचे वर्ष | प्राप्त गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

५. सनद क्रमांक व दिनांक :-

६. सनद जारी करणारे प्राधिकराण् :-

७. सेवानिवृत्ती तारीख :-

८. सेवानिवृत्ती पुर्वी, धारण केलेले शेवटचे पद :-

९. यापुर्वीचे सेवेचा तपशिल :-

| अ.क्र. | कार्यालयाचे / प्राधिकरणाचे नाव | सेवा कालावधी | सेवेच्या काळातील पदनाम |
|---|---|---|---|
| | | | |

१०. विधी व्यवसायी असल्यास व्यवसाय सुरु केल्याचा दिनांक :-

११. अवगत असलेल्या भाषांचा तपशिल :-

१२. वनविभाग अथवा आस्थापना विषयक बाबी संबंधी वकीली व्यवसायाशी निगडीत विशेष प्रकरणे हाताळली असल्यास त्याबाबतचा थोडक्यात तपशिल (१० ओळी) :-

आपला/ आपली विश्वासू,

(अर्जदाराची स्वाक्षरी नावासह)

**प्रमाणपत्र**

मी याव्दारे प्रमाणित करतो/करते की, या अर्जामध्ये नमूद केलेली माझी माहिती ही पुर्णपणे खरी आहे. माहिती चुकीची किंवा खोटी आढळलेस मी नेमणुकीचे प्रक्रियेमधून वगळण्यास पात्र ठरेन. तसेच माझी उक्त पदी निवड झाल्यास शासन महसूल व वन विभाग, मुंबई शासन निर्णय क्र. एस-३०/१२/ २०१२/प्रक्र.२३३/फ-६, दिनांक १३/११/२०१३ मध्ये नमूद सर्व अटी / शर्ती मला मान्य राहतील.

आपला/ आपली विश्वासू,

(अर्जदाराचीस्वाक्षरी नावासह)

वन विभागासाठी कंत्राटी पध्दतीने ११ विधी सल्लागार नियुक्त करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

तारीख: १३ नोव्हेंबर, २०१३.

**संदर्भ —**

**१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक २४ ऑक्टोबर, २०१३.**

**प्रस्तावना —**

वने ही राष्ट्रीय संपत्ती आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २०% क्षेत्र वनाखाली आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण वन संपत्तीवर होत आहे. त्यामुळे वन जमीन व वन संपत्तीचे सर्वेक्षण, संरक्षण व संवर्धन करणे जिकरीचे झाले आहे. वन जमिनीवर होणारे अतिक्रमण, अवैध वृक्षतोड तसेच वन्यप्राण्याचे अवैध शिकारींच्या प्रकरणांवर प्रभावी नियंत्रण व आळा घालण्यासाठी शासनातर्फे सर्वोतोपरी दक्षता घेतली जाते. तथापि, वन विषयक गुन्हा करणांऱ्या विरुध्द न्यायालयात दाखल होणारे प्रकरणांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. न्यायालयासमोर शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्याच्या दृष्टीने न्यायालयात शासनातर्फे दाखल हाणारे प्रतिज्ञापत्रात / जबाबात गुणवत्ता असणे आवश्यक आहे. यासर्व बाबींची दखल घेऊन माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्र. १२७७/२००० संदर्भात दिनांक ३० एप्रिल, २००४ रोजी दिलेल्या आदेशात पुढील निदर्शने नोंदविलेली आहेत.

"That on earlier occasion this court has already directed the Forest Department to create legal cell in each division and the officers incharge of the legal cell should monitor the cases pending in the Court."

उक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णयाद्वारे वन विभागासाठी ११ विधी अधिकारी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्याबाबत दिशानिर्देश देण्यात आले होते. तथापि, या संदर्भात दिनांक २९.१०.२०१३ रोजी वरिष्ठ वन अधिकारी व क्षेत्रीय वन अधिकाऱ्याबरोबर आयोजित व्हिडीओ कॉन्फरन्स मध्ये झालेल्या व्यापक चर्चेनंतर याबाबत जारी करावयाचे दिशा निर्देशाबाबत अधिक स्पष्टता आणण्याच्या दृष्टीकोनातून संदर्भिय शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय—**

२. उक्त प्रस्तावनाच्या अनुषंगाने वन विभागासाठी रु. ५०,०००/- (पन्नास हजार रुपये फक्त) प्रति महिना इतक्या ठोक रकमेवर कंत्राटी पध्दतीने पुढील तपशिलाप्रमाणे ११ विधी सल्लागारांची नियुक्ती करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वनवृत्त / कार्यालय | विधी सल्लागारांची संख्या | ज्या कार्यालयांसाठी विधी सल्लागारांची सेवा उपलब्ध राहील त्यांचा तपशील | विधी सल्लागारांचे मुख्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अमरावती | १ | अमरावती प्रा. वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वनविभाग तसेच मेळघाट व्याघ्र प्रकल्प व त्याअंतर्गत सर्व वन्यजीव विभाग | अमरावती |
| २ | गडचिरोली | १ | गडचिरोली प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग व विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अल्लापल्ली. | गडचिरोली |
| ३ | चंद्रपूर | १ | चंद्रपूर प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच ताडोबा व्याघ्र प्रकल्प व त्या अंतर्गत चंद्रपूर येथील कार्यालय. | चंद्रपूर |
| ४ | नागपूर | १ | नागपूर प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वनविभाग तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव पूर्व), पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर आणि वन्यजीव विभाग गोंदिया. | नागपूर |
| ५ | औरंगाबाद | १ | औरंगाबाद प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच उप वनसंरक्षक (वन्यजीव) औरंगाबाद. | औरंगाबाद |
| ६ | यवतमाळ | १ | यवतमाळ प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) पांढरकवडा. | यवतमाळ |
| ७ | नाशिक व धुळे | १ | नाशिक व धुळे प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग, वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक तसेच अपर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक. | नाशिक |
| ८ | पुणे | १ | पुणे प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे. | पुणे |
| ९ | कोल्हापूर | १ | कोल्हापूर प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), कोल्हापूर | कोल्हापूर |
| १० | ठाणे | १ | ठाणे प्रादेशिक वनवृत्त व त्याअंतर्गत सर्व प्रादेशिक वन विभाग तसेच वनसंरक्षक (वन्यजीव), ठाणे. | ठाणे |
| ११ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभाग | १ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मुंबई, मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई. | मुंबई |

२. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाकरीता समितीच्या सदस्य सचिवांची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे पार पाडतील.

### ३.३ नियुक्तीबाबतची प्रक्रिया

समितीमार्फत यशस्वी उमेदवारास नियुक्तीबाबत लेखी स्वरुपात संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षकमार्फत कळविण्यात येईल. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागाकरिता ही जबाबदारी मुख्य वनसंरक्षक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे पार पाडतील.

निवड झालेल्या उमेदवारास परिशिष्ट —अ मधील विनिर्दिष्ट करारनामा करणे बंधनकारक राहील. शासनाच्या वतीने संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक हे करारनामा करतील. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभाग संदर्भात मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली हे शासनाच्या वतीने करारनामा करतील.

### ४. विधी सल्लागारांच्या जबाबदाऱ्या :

१. संबंधित वन अधिकाऱ्याकडून विधी विषयक सल्ला देण्याबाबत लेखीस्वरुपात संदर्भ प्राप्त झाल्यावर त्यांना लेखी स्वरुपात सल्ला देणे.

२. वन विभागातर्फे दाखल करावयाचे परिच्छेदनिहाय अभिप्राय / शपथपत्राचे प्रारुप हे कायदेशिरदृष्टया बरोबर आहे किंवा कसे, याबाबत संबंधित वन अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्यावर संबंधित वन अधिकाऱ्यांनी तयार केलेल्या प्रारुपाची छाननी / तपासणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा करणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन प्रकरणांच्या अद्यावत स्थितीबाबत संबंधित वन अधिकाऱ्यांना वेळोवेळी लेखी अवगत करणे. मात्र याबाबतची माहिती अद्यावत ठेवण्याची प्राथमिक जबाबदारी वन विभागाच्या संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

४. शासनाच्या विरोधात न्यायालयीन निकाल लागल्यास, अपील / पुनर्विलोकनाची प्रक्रिया वेळीच व्हावी, याबाबत दक्षता घेणे.

५. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

६. करारनाम्याच्या कालावधीत विधी सल्लागार हा वन विभागाच्या विरोधातील कोणतेही प्रकरण हाताळणार नाही.

### ५. विधी सल्लागारांकडून सल्ला प्राप्त करुन घेणाऱ्या वन अधिकाऱ्यांची जबाबदारी :

१. **वरील प्रमाणे नियुक्त विधी सल्लगारांची सेवा ही मुलत: कंत्राटी स्वरुपाची असून तो पुर्णकालीन नियमीत शासकीय सेवक नाही. त्यामुळे विधी सल्लागाराची नियुक्ती झाली म्हणजे सर्व न्यायालयीन प्रकरणांबाबत पाठपुरावा करण्याची जबाबदारी विधी सल्लागारांची आहे, असे गृहीत धरण्यात येऊ नये.**

**टिप — वन्यजीव शाखेतील ज्या उप वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी यांची कार्यालये त्यांच्या कार्यक्षेत्राशी निगडीत वनवृत्ता पासून लांब आहेत. त्यांनी जवळच्या वनवृत्तांअंतर्गत विधी सल्लगारांची सेवा प्राप्त करण्याची मुभा राहील. त्यासाठी संबंधित विधी सल्लागारांना कोणतेही अतिरिक्त शुल्क / भत्ता देय राहणार नाही.**

**३. कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया**

**३.१ शैक्षणिक अर्हता व अनुभव —**

१. उमेदवार सेवा निवृत्त जिल्हा न्यायाधीश / अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश / प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी असावा. असे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर कोणत्याही शासकीय संस्था किंवा सार्वजनिक उपक्रमासाठी विधी सल्लागार म्हणून किमान २० वर्षाचा अनुभव असलेला असावा. उपरोक्त दोन्ही श्रेणीचे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आणि त्यापेक्षा वरिष्ठ न्यायालयात / कामगार न्यायालयात किंवा औद्योगिक न्यायलयात अभियोक्ता म्हणून फौजदारी, दिवाणी, अस्थापना विषयक किवा यथास्थितीत कामगार विषयक प्रकरणे किमान १० वर्षे हाताळणाऱ्या उमेदवारांचा विचार करता येईल.

२. उमेदवार वन विषयक, फौजदारी व दिवाणी विषयक, सेवा व आस्थापना तसेच कामगार विषयक बाबींत ज्ञानसंपन्न असेल.

३. उमेदवारास मराठी, इंग्रजी व हिंदी भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**३.२ निवड प्रक्रिया**

कंत्राटी पध्दतीने विधी सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी मुलाखतीकरिता संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक किंवा यथास्थितीत मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे स्थानिक व राज्य पातळीवरील प्रमुख वृत्तपत्रात जाहिरात देतील तसेच ही जाहिरात वन विभागाच्या संकेत स्थळावर पुरेशा कालावधी पर्यंत ठेवण्यात येईल. विधी सल्लागारांची निवड उमेदवारांकडून प्राप्त अर्जाची पडताळणी केल्या नंतर अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीची तारीख सर्व वनवृत्तांबाबत वेगवेगळी असावी, याबाबत संनियत्रण व समन्वय ठेवण्याची जबाबदारी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची राहील.

मुलाखत घेण्याची व योग्य उमेदवार निवडण्याची जबाबदारी खालील समितीची राहील —

| | |
|---|---|
| मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक | अध्यक्ष |
| संबंधित जिल्हाधिकारी | सदस्य |
| सह सचिव, विधी व न्याय विभाग (नागपूर / मुंबई / औरंगाबाद) | सदस्य |
| वनवृत्ताच्या मुख्यालयातील उप वनसंरक्षक (प्रादेशिक) | सदस्य सचिव |

**टिप —**

१. नाशिक व नागपूर वनवृत्त तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विभागासंदर्भात समितीच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी संबंधित अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), हे पार पाडतील.

एकावेळी ही मुदत ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही याची काळजी सक्षम प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यांनतर अशा उमेदवारांची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-यांचे मत झाल्यास, त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

इ) सबंधित सक्षम प्राधिकारी शासनाच्या वतीने नियुक्तीचे वेळी संबधिताबरोबर विहित प्रपत्रात करार करतील. कराराचे विहित प्रपत्र परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आले आहे. कराराची सर्व कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही संबधित सक्षम प्राधिकारी कार्यालयाची जबाबदारी असेल.

ई) करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या विधी सल्लागारांना एकत्रित मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

७. उपरोक्त बाबीवरील एकूण खर्च रु. ६६.०० लक्ष हा सन २०१३-२०१४ च्या चालू आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या १३ व्या वित्त आयोगाच्या वनीकरण व वन्यजीव, १०१ (११) वनसंरक्षण, विकास व पूनर्निर्मिती (११) (३२) १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वन व्यवस्थापनासाठी केंद्रीय सहाय्य (२४०६ ७२२३) या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:२७५/२०१३/व्यय-१०, दिनांक ११ जुलै, २०१३ व अनौपचारिक संदर्भ क्र.१०२/२०१३/विआक, दिनांक २६ जुलै, २०१३ व विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६७३/२०१३/ई, दिनांक २५ सप्टेंबर २०१३ रोजीच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२१२१५२४०९०५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Pratapsingh Pardeshi

Digitally signed by Pravin Pratapsingh Pardeshi
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pravin Pratapsingh Pardeshi
Date: 2014.02.12 15:28:16 +05'30'

(प्रवीणसिंह परदेशी)

प्रधान सचिव (वने) महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. न्यायालयीन प्रकरणाचा पाठपुरावा करणे, न्यायालयात शासनाची बाजू प्रभावीपणे मांडणे व शासनाचे हित जोपासण्याची प्राथमिक जबाबदारी ही विधी सल्लागारांकडून सल्ला प्राप्त करुन घेणाऱ्या वन अधिकाऱ्यांची राहील.

३. प्रकरणांबाबत आवश्यक दस्तऐवज विधी सल्लागारास पुरविणे व जबाबदार आणि प्रकरणाबाबत माहितगार अधिकाऱ्यांद्वारे विधी सल्लागारास माहिती (briefing) देण्याची जबाबदारी सल्ला प्राप्त करणाऱ्या अधिकाऱ्यांची राहील.

४. विधी सल्लागारांची भूमिका ही फक्त न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी वन अधिकाऱ्यांना वैधानिक सल्ला देण्यापर्यंत आहे. सबब, न्यायालयात दाखल करावयाचे शपथपत्र / जबाबाचे प्राथमिक प्रारुप तयार करण्याची जबाबदारी सल्लाप्राप्त करुन घेणाऱ्या वन अधिकाऱ्याची राहिल.

५. किरकोळ आणि नियमित स्वरुपांचे प्रकरणी विधी सल्लागारावर अवलंबून राहून कालापव्यय करु नये. विधी सल्लागाराची सेवा क्लिष्ट आणि अपरिहार्य तसेच दूरगामी परिणाम होणाऱ्या प्रकरणी उपयोगात आणावी.

६. संबंधित विधी सल्लागार त्यांचेवर सोपवलेल्या जबाबदाऱ्या चोखपणे बजावत आहे, याबाबत संनियत्रण ठेवण्याची अतिरिक्त जबाबदारी सुध्दा त्यांच्याकडून सल्ला प्राप्त करणाऱ्या वन अधिकाऱ्याची राहील.

७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / संबंधित मुख्य वनसंरक्षक हे त्यांच्या नियमित बैठकीत विधी सल्लागारांची कामगिरीबाबत आढावा घेतील.

८. शासनाच्या विरोधात निकाल लागलेल्या प्रकरणी अपील/ पुनर्विलोकन/ पुनर्निरीक्षण अर्ज विहीत मुदतीत (The limitation Act, १९६३ मध्ये विर्निदिष्ट कालावधीत) दाखल होईल यांची दक्षता घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित वन अधिकाऱ्यांची राहील.

६. उपरोक्त ११ विधी सल्लागार एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. हे विधी सल्लागार शासकीय सेवक म्हणून गणले जाणार नाहीत. त्यांची नियुक्ती या शासन निर्णयासोबत जोडलेले परिशिष्ट “अ” मधील विनिर्दिष्ट करारनाम्याच्या अधीन राहील.

ब) परिशिष्ट "अ" मधील उल्लेखीत सक्षम प्राधिकारी (competent Authority) याचा अर्थ संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक किंवा यथास्थितीत मुख्य वनसंरक्षक तथा संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान असा आहे.

क) विधी सल्लागारास मानधन अदा करण्यास जबाबदारी संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक किंवा यथास्थितीत मुख्य वनसंरक्षक तथा संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांची राहील.

ड) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यासाठी करण्यात याव्यात. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना

६. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, जी.टी.हॉस्पीटल, मुंबई.
७. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),
१२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१३. सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),
१४. सह सचिव, विधी व न्याय विभाग (नागपूर / मुंबई / औरंगाबाद)
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व जिल्हा सरकारी वकील.
१७. सर्व उप वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव),
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा अनुज्ञेयता व लेखा परिक्षा) मुंबई.
२०. अधिदान व लेखाधिकारी मुंबई
२१. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
२२. वित्त विभाग, व्यय-१०/वित्तीय सुधारणा-१, अर्थसंकल्प-६, वित्त आयोग कक्ष, मंत्रालय, मुंबई.
२३. कार्यासन अधिकारी, ब-१, जागतीक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई.
२४. सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई -४०० ०३२.
२५. फ-६ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई -४०० ०३२. (निवड नस्ती).

परिशिष्ट — अ

(महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक - एस-३०/१२/२०१२/प्र.क्र.२३३/फ-६, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१३ )

**AGREEMENT**

This agreement is made at -------- on ----------- between the Governor of State of Maharashtra exercising the Executive Powers of the Government of State of Maharashtra through Shri--------- COMPETENT AUTHORITY, having his office at--------------- hereinafter referred to as "the Government" (which expression shall unless it be repugnant to the context or meaning thereof be deemed to its successors, agents and permitted assignee) as the first party and the competent authority.

WHEREAS the Government has decided to appoint ----- as legal consultant on contract basis. Accordingly, the Revenue and Forest Department, Government of Maharashtra has advertised in daily newspaper inviting applications for the post of --------- in accordance with the provisions of Government Resolution No------------- Dtd.---------------.

AND WHEREAS in pursuance to the above advertisement, the candidate possessing minimum qualification prescribed for had applied and were subsequently called for interview for the said post of-------.

AND WHEREAS after holding the interview of candidates called for interview for the post of----------. Shri/smt.------------------ were invited for accepting his/her selection as a ------------ for a period of 11 months on the consolidated remuneration of Rs.-----------(Rupees---------only) on the terms and conditions as stated herein below

AND WHEREAS shri/smt.--------- has vide his/her letter dated---------- accepted the offer regarding appointment as a on contract basis on the terms and conditions prescribed in this Agreement.

AND WHEREAS shri/smt.------------- has therefore agreed and consented to execute an agreement.

**THEREFORE NOW THIS AGREEMENT WITNESS AND IT IS HEREBY AGREED AND DECLARED SO BY AND BETWEEN THE PARTIES HERETO AS FOLLOWS**

1. The first party hereby agrees to appoint Shri/Smt.------- as a -----------on contract basis for a period of 11 months commencing from --------to--------or consolidated remuneration will be payable at the end of each Calendar month according to Christian Calendar. It is agreed that IInd party shall not be entitled for separate T.A. and D.A. during the contract period. However competent authority may sanction the T.A. under compelling and exceptional circumstances.
2. The --------------- and concerned competent authority will have full administrative control over the second party and second party is bound to perform duties, as per General and Special instructions set forth by the first party. Failure to do so shall be treated as breach of agreement/contract and will be liable for termination of this agreement.
3. The duties for the post of------------- is mentioned in para no.4 of G.R. no. S-30/12/2012/C.R.233/F-6, dated 13 Nov., 2013. Annexed to this Agreement as schedule-I. It is agreed the duties prescribed in the schedule-I are not exhaustive but are illustrative and second party will be bound to perform its duties, as directed by the competent authority from time to time. The second party shall carry out its duties as -------- and abide by orders/instructions issued by the first party with due deligence and efficiency during period of contract.